पुढारी





**औरंगाबाद :** पूर्णत्वाकडे असलेले ऑरिक हॉलचे काम. ऑरिक सिटीमध्ये विजेचा एकही खांब असणार नाही. दुसरे छायाचित्र करमाडजवळील दुहेरी रेल्वे उड्डाणपूल.

# शेंद्रा पार्कची ६५ टक्के कामे पूर्ण !

## ६३ कि.मी. लांबीचे रस्ते : भूमिगत वीज वाहिन्या; पाच मजली ऑरिक हॉल पूर्णत्वाकडे

**औरंगाबाद : विशेष प्रतिनिधी**

औरंगाबाद इंडस्ट्रियल सिटीच्या (ऑरिक) शेंद्रा पार्कमधील पायाभूत सुविधांची ६५ ते ७० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. ६३ कि.मी. लांबीच्या रस्त्यांपैकी ६२ मीटर रुंदीच्या मुख्य रस्त्याचे डांबरीकरण पावसाळ्यापूर्वी पूर्ण होईल. शेंद्रा-बिडकीन पार्कची प्रशासकीय इमारत असलेल्या पाच मजली ऑरिक हॉलचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे. भूमिगत वीज वाहिन्यांच्या डक्टचे जाळे उभारण्याचे कामही पूर्ण झाले आहे. मोटारसायकलने थेट आत जाऊन बिघाड दुरुस्त करता येईल, एवढ्या उंचीचे डक्ट राज्यातील औद्योगिक वसाहतीत प्रथमच बसविण्यात आले आहेत.

ऑरिक सिटीचे सरव्यवस्थापक गजानन पाटील, 'एमआयडीसी'चे प्रादेशिक अधिकारी सोहम वायाळ यांनी शनिवारी पायाभूत सुविधांच्या कामांची पाहणी केली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना पाटील म्हणाले की, जालना रोडवरून ऑरिक सिटीमध्ये प्रवेश करण्यासाठी करमाड आणि सटाणा येथे दोन रेल्वे उड्डाणपुलांची कामे प्रगतिपथावर आहेत. करमाडच्या उड्डाणपुलावरून येत्या जुलै महिन्यात, तर सटाणाच्या पुलावरून डिसेंबर महिन्यात वाहने धावतील. सटाण्याचा पूल पुढे समृद्धी महामार्गास जाऊन मिळणार असल्याने जालना रस्त्यावरून थेट मुंबई व नागपूरला जाता येईल.

पाच मजली ऑरिक हॉलचे बांधकाम मुदतीपूर्वीच म्हणजे येत्या ऑक्टोबरपर्यंत पूर्ण होईल. दोनशे सीसीटीव्ही कॅमेरे तसेच फिरत्या कॅमेऱ्यांच्या सुरक्षेचे कवच या इमारतीस असणार आहे. तळमजल्यावर कमांड कंट्रोल रूम असणार आहे. पाचव्या मजल्यावर ऑरिकचे प्रशासकीय कार्यालय असेल. इतर मजले कंपनी, बँका व व्यावसायिक प्रतिष्ठांनाना भाड्याने दिले जातील. १२९ कोटी खर्चून या इमारतीचे काम पूर्ण केले जाईल, असे पाटील यांनी स्पष्ट केले.

**अद्ययावत 'फायर लाईन'** : ऑरिक सिटीमधील कंपन्यांमध्ये अग्निरोधक यंत्रणा असणारच आहे, मात्र बाहेरील परिसरावर अत्याधुनिक फायर लाईनचे लक्ष राहणार आहे. परिसरात कुठेही आग लागल्यास पाईप लाईनच्या धर्तीवरील फायर लाईनमधून पाण्याचा आपोआप शिडकावा होऊन वेळीच आग विझविली जाईल. अशी सुविधा असणारी ऑरिक सिटी ही देशातील पहिलीच औद्योगिक वसाहत असणार आहे.



भूमिगत वीज पुरवठ्यासाठी अशा डक्ट उभारण्यात आल्या आहेत. (छायाचित्रे : सुनील थोटे)

### जूनमध्ये मिळणार पाणी

शेंद्रा पार्कला दररोज २० लाख लिटर पाणी लागणार आहे. जायकवाडी ते शेंद्रा या पाईपलाईनमधून येत्या जून महिन्यात शेंद्रा वसाहतीत पाणी पोहोचेल. याशिवाय प्रक्रिया केलेले दहा लाख लिटर सांडपाणी वापरण्यात येणार असल्याने जायकवाडीवरील अवलंबित्व निम्म्याने घटेल, असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला.

### विजेचे पाच सबस्टेशन

शेंद्रा पार्कमध्ये विजेची पाच सब स्टेशन उभारली जाणार आहेत. यापैकी दोन सबस्टेशनचे काम हाती घेण्यात आले आहे. महावितरण कंपनीकडून २२० के. व्ही. क्षमतेचे आणखी एक केंद्र उभारले जाणार आहे.